पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१०१३/२०१७
दिनांक : २९/०७/२०१७

प्रति,

मा.......................................
सदस्य, विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा दिनांक **०४/०८/२०१७** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **०४/०८/२०१७** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2017 sub committee sabhapati.doc

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.विधी समिती

कार्यपत्रिका क्रमांक – ०९

दिनांक : ०४/०८/२०१७ **वेळ : दु. ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **०४/०८/२०१७** रोजी दुपारी **३.००** वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

दिनांक **२१/०७/२०१७** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ८)** सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'प्रशासन अधिकारी' अभिनामाची पदे र.रु.९३००-३४८०० ग्रेड पे ५४०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. जाहिरात क्र.९३/२०१३ नुसार आदेश क्र.प्रशा/१/कावि/१४९२/१३, दि.२०/११/२०१३ अन्वये श्री.खोत संदिप दादासाहेब यांना खुला (भ.ज.(क)) आणि श्री.बहुरे सिताराम देवचंद यांना वि.जा.(अ) या प्रवर्गातून सरळसेवा प्रवेशाने प्रशासन अधिकारी या पदावर नियुक्ती देण्यात आलेली आहे. प्रस्तुतच्या नियुक्ती आदेशामध्ये आपण जर दि.०१/११/२००५ पूर्वी शासकीय/निमशासकीय सेवेत दाखल झाला असाल तर आपण पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर रुजू झाल्यापासून तीन महिन्याच्या कालावधीत, संबंधित शासकीय/निमाशासकीय कार्यालयाने आपले सेवानिवृत्ती वेतन अंशदान (Pension Contribution) वरजा वेतन अंशदान (Leave Salary Contribution) ची रक्कम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे वर्ग केल्यास आपणांस महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ नुसार निवृत्तीवेतन योजना लागू राहील. तसेच संबंधित शासकीय/निमशासकीय कार्यालयाकडे जमा असणारी भविष्य निर्वाह निधीची व्याजासह रक्कम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे वर्ग केल्यास आपणांस सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम १९९८ प्रमाणे भविष्य निर्वाह निधी योजना लागू राहील. अन्यथा आपणांस दि.३१ ऑक्टोंबर २००५ नुसार नवीन अंशदान निवृत्तीवेतन योजना म्हणजेच 'परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना' (Defined Contribution Pension system) लागू राहील', याप्रमाणे अट नमूद करण्यात आलेली आहे.

श्री.खोत संदिप दादासाहेब हे दि.११/१२/२०१३ रोजी प्रशासन अधिकारी पदावर महापालिका सेवेत रूजू झाले आहेत. तत्पूर्वी श्री.खोत संदिप हे दि.१४/१०/२००५ पासून जिल्हा परिषद अहमदनगर या आस्थापनेवर ग्रामसेवक पदावर कार्यरत होते. श्री.बहुरे सिताराम देवचंद हे दि.१७/१२/२०१३ रोजी प्रशासन अधिकारी पदावर महापालिका सेवेत रूजू झाले आहेत. तत्पूर्वी श्री.बहुरे सिताराम हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद या आस्थापनेवर दि.२२/०६/२००५ पासून टायपिस्ट या पदावर कार्यरत होते. संबंधित कार्यालयामध्ये सदरच्या अधिका-यांना महाराष्ट्र नागरी सेवा (नियम) १९८२ नुसार निवृत्तीवेतन योजना लागू होती. उक्त अधिका-यांनी प्रशासन अधिकारी पदाकरीता अर्ज करताना दि.१२/०१/२००७ च्या शासन परिपत्रकामधील अटी व शर्तींची पूर्तता केलेली आहे.

नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीनुसार संबंधितांचे पूर्वीच्या कार्यालयाकडे रजा वेतन अंशदान व सेवानिवृत्ती वेतन अंशदान रकमेची मागणी केली असता, श्री.खोत यांच्यासंदर्भात अहमदनगर जिल्हा परिषद यांनी जिल्हापरिषद सेवेतून एखादा कर्मचारी महामंडळे/नगरपालिका/महानगरपालिकेकडे सेवेत हजर झाल्यास संबंधित संस्थांना सेवानिवृत्ती वेतन अंशदान व रजा वेतन अंशदान वर्ग करण्यासंदर्भात **नियम अस्तित्त्वात असल्याचे दिसून येत नसलेबाबत** मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(ग्रा.पं.) जिल्हा परिषद अहमदनगर यांनी जा.क्र.साप्रवि२/ग्रामपंचायत८/६८/१६, दि.२७/०४/२०१६ अन्वये कळविले आहे. तर श्री. बहुरे यांच्याबाबत महाराष्ट्र शासन शिक्षण विभागाकडील दि.२१/०७/१९८३ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्रातील विद्यापीठे तसेच संलग्नित अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर वर्गाला निवृत्तीवेतन अनुदान योजना दि.०१/१०/१९८२ पासून लागू करण्यात आली आहे. श्री. बहुरे यांची नेमणूक दि.०१/१०/१९८२ नंतर झाली असल्यामुळे सेवानिवृत्ती अंशदान भरण्याचा प्रश्न उद्भवत नसलेबाबत मा.कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी दि.१८/०२/२०१६ चे पत्रान्वये कळविले आहे.त्यामुळे श्री.खोत व श्री.बहुरे यांनी दि.२०/०८/२०१६ च्या अर्जान्वये नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीनुसार अट क्र. ६ ची पूर्तता न झाल्याने सदरची रक्कम स्वत: भरण्यास तयार असल्याबाबत कळविले असून पूर्वीची सेवा सलग धरुन महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन नियम १९८२ नुसार सेवानिवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी, रजा वेतनाच्या लाभासाठी विचार करण्याबाबत विनंती केली आहे.

त्यानुसार मा.मुख्यलेखापरिक्षक यांचेकडील क्र.मुलेप/१/कावि/४८६/१७, दि.१९/०१/२०१७ अन्वये प्रकरणी श्री.खोत व श्री. बहुरे, प्रशा. अधिकारी यांचे **नियुक्ती आदेश क्र.प्रशा/१/कावि/१४९२/१३, दि.२०/११/२०१३ मधील अट क्र.६ शिथिल करावी लागेल आणि शासकीय/निमशासकीय कार्यालयातील कर्मचारी यांची मनपा सेवेत येणेपूर्वीची सेवा सेवानिवृत्ती वेतनासाठी व**

सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम १९९८ प्रमाणे भविष्य निर्वाह निधी योजनासाठी धरणेबाबत मनपाचे धोरण निश्चित नसलेने याबाबत मा.महापालिका सभेची मान्यता घ्यावी लागेल याप्रमाणे अभिप्राय दिले आहेत.

सबब, श्री.खोत संदिप व श्री.बहुरे सिताराम यांच्या मागील सेवेला संरक्षण देणेप्रकरणी **नियुक्ती आदेश दि.२०/११/२०१३ मधील अट क्र. ६ शिथिल करणे,** श्री.खोत यांची जिल्हा परिषद अहमदनगर या आस्थापनेवर दि.१४/१०/२००५ ते दि.१०/१२/२०१३ या कालावधीकरीता केलेली सेवा त्याचप्रमाणे श्री.बहुरे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद या आस्थापनेवर दि. २२/०६/२००५ ते दि.१६/१२/२०१३ या कालावधीकरीता केलेली **सेवा पिंपरी चिंचवड महापालिकेकडे सलग सेवा धरणे, उक्त कालावधीकरीता सदरच्या कार्यालयाकडे जमा असलेल्या सेवानिवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी आणि रजा वेतनाच्या रकमा लेखा विभागामार्फत निश्चित करुन संबंधित अधिका-यांमार्फत भरुन घेणे आणि सदरच्या रकमा भरुन घेतल्यानंतर त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ नुसार निवृत्तीवेतन योजना आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम १९९८ प्रमाणे भविष्य निर्वाह निधी योजना लागू करणे या बाबीस मान्यता** देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.



नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१०१३/२०१७
दिनांक : २९/०७/२०१७ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2017 sub committee sabhapati.doc